# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## गुरुवार, दिनांक २१ जुलै, २०१६
## (सकाळी १०.०० ते १०.४५ वाजेपर्यंत)

**(बुधवार, दिनांक २० जुलै, २०१६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री राज पुरोहित, सुनिल प्रभू, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री प्रताप सरनाईक, संजय केळकर, सुनिल शिंदे, राजेंद्र पाटणी, प्रकाश आबिटकर, ॲड. पराग अळवणी, डॉ.राहुल पाटील, प्रा.मेधा कुलकर्णी, सर्वश्री अजय चौधरी, प्रशांत बंब, सुनिल राऊत, प्रा. देवयानी फरांदे, डॉ. मिलिंद माने, डॉ. अशोक उईके, सर्वश्री मंगेश कुडाळकर, उन्मेश पाटील, उल्हास पाटील, समीर कुणावार, किशोर पाटील, डॉ.आशिष देशमुख, डॉ.बालाजी किणीकर, श्री नरेंद्र पवार, प्रा. चंद्रकांत सोनवणे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर) :**

"शैक्षणिक क्षेत्रामध्ये राज्य अग्रेसर रहावे म्हणून शासनाने राबविलेल्या प्रगत शैक्षणिक कार्यक्रम व त्याला मिळणारे यश, ग्रामीण भागामध्ये विनामुल्य शिक्षण देणाऱ्या जिल्हा परिषद शाळा प्रगत करण्यासाठी शासन करीत असलेले प्रयत्न, त्याकरिता भरविण्यात येणारी शैक्षणिक चर्चा सत्रे, शिक्षकांचे प्रशिक्षण इत्यादीमुळे इंग्रजी माध्यमाच्या शाळा सोडून जिल्हा परिषद मराठी शाळांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची वाढती संख्या, शासनाच्या चांगल्या शैक्षणिक धोरणांचा परिणाम म्हणून इ. १० वीच्या परिक्षेचा वाढता निकाल व त्यामुळे इयत्ता ११ वीच्या प्रवेशासाठी निर्माण झालेली वाढती चुरस, त्या अडचणीत भर म्हणजे प्रवेश प्रक्रियेसाठी आवश्यक असणारा अधिवास दाखला, उत्पन्नाचा दाखला व जातीचा दाखला मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांना तहसिलदार कार्यालयात मारावे लागणारे हेलपाटे, केंद्र शासनाच्या धोरणानुसार संबंधित दाखले विद्यार्थ्यांना शाळेत निकालासोबत देण्याची आवश्यकता, इयत्ता ११ वी व १२ वी ची फेरपरिक्षा घेऊन विद्यार्थ्यांचे वाचलेले वर्ष, इयत्ता १० वी उत्तीर्ण न झालेल्या विद्यार्थ्यांना कौशल्य विकासासाठी प्रवेश देण्याबाबत घेतलेल्या निर्णयाने लाखो विद्यार्थी व पालकांमध्ये आनंदाचे वातावरण असणे परंतु, त्याचवेळेस खाजगी संस्था चालक ऑफ लाईन प्रवेश देऊन लाखो रुपयांचा गैरव्यवहार करीत असल्याची बाब निदर्शनास येणे, अनुदानास पात्र ठरलेल्या शाळांना अनुदान देण्याची बाब तातडीने विचारात घेण्याची आवश्यकता, नवीन शाळा/महाविद्यालयांना मान्यता देण्याबाबत तातडीने सकारात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता, अभियांत्रिकी, व्यवस्थापन महाविद्यालयात शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या जागा रिकाम्या असणे, नवीन विद्यापीठ कायदा त्वरित अंमलात येणे या व इतर मागण्या तातडीने सोडविण्याची आवश्यकता व याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

## (सकाळी ११.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे.**

**दोन : स्थगन प्रस्तावाच्या सूचना – (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये).**

**तीन : औचित्याचे मुद्दे.**

**चार : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

(१) **सर्वश्री विजय औटी, कुणाल पाटील, डी.एस.अहिरे, शेख असिफ शेख रशीद, अमित झनक, राहुल बोंद्रे, अमिन पटेल, विजय वडेट्टीवार, अस्लम शेख, गणपतराव देशमुख, अबू आजमी, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे वस्त्रोद्योग मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यातील सहकारी क्षेत्रातील एकूण १४९ सहकारी सूत गिरण्यांपैकी केवळ ६६ सूत गिरण्या कार्यरत असणे, तोट्यामध्ये असणाऱ्या सूत गिरण्यांची संख्या ५४ असून विविध कारणांमुळे १६ गिरण्या बंद अवस्थेत असणे, यामुळे शासनाला तब्बल ३२३ कोटी रुपयांचा तोटा होत असल्याची माहिती दिनांक ७ मार्च, २०१६ रोजी वा त्या सुमारास उघडकीस येणे, तसेच राज्यात अस्तित्वात असलेल्या पॉवरलुम उद्योगाची परिस्थिती अत्यंत बिकट असणे, याचे कारण असे जेवढे पॉवरलुम राज्यात आहेत त्या निकषानुसार राज्यात सुतगिरण्या नसणे ज्यामुळे येथील पॉवरलुमधारकांना दुसऱ्या राज्यातून सुत आयात करावे लागत असणे, मंजूर प्रकल्प अहवालानुसार स्वभाग भांडवल व वित्तीय संस्थांकडून कर्ज उभारणी न केल्याने ६ सुत गिरण्या बंद असून जुनी यंत्रसामग्री वापरल्यामुळे वर्धन क्षमता कमी होऊन ७ गिरण्यांना टाळे लागणे, कर्जाची वसूली होऊ न शकल्याने बँकांनी दोन गिरण्याना ताब्यात घेणे, तसेच २६ सूतगिरण्या अवसायनात काढण्यात येणे, सहकारी सूत गिरण्यांचा तोटा कमी करण्यासाठी खर्चावर नियंत्रण आणणे, तसेच सौर ऊर्जेसाठी शासनाने अनुदान दिल्यास सूत गिरण्यांचा खर्च आटोक्यात येण्याची शक्यता वर्तविण्यात येणे, गिरण्यांसाठी लागणारे सूत व्यापाऱ्यांकडून खरेदी न करता थेट सीसीआयकडून केल्यास आर्थिक बाजू भक्कम होऊन आधुनिकीकरणातूनही खर्च कमी होण्याची शक्यता असणे, सहकारी सूत गिरण्यांना विदर्भ-मराठवाड्याच्या धर्तीवर वीज दरात प्रति युनिट तीन रुपये प्रमाणे सवलत अनुदान प्रति चाती ३००० रुपये प्रमाणे बिनव्याजी कर्ज देणे, शॉर्ट मार्जिन अदा करणे, याशिवाय यासहकारी सुत गिरण्या आर्थिक अडचणीतून बाहेर पडत नाही तो पर्यंत त्यांच्यावरील कर्जाची परतफेड करु नये, टफच्या अनुषंगाने कॅपीटल सबसिडी १० टक्क्याहून ३० टक्के करणे राज्यातील ५० टक्के पॉवरलुम असलेल्या नाशिक जिल्ह्यातील मालेगाव शहरात प्रोसेस हॉऊस आणि फिनीशिंग संबधित संपूर्ण यंत्रणा व उद्योगाची स्थापना करून विणकरांना विशेष अनुदान देण्यासाठी दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करण्याबाबत शासन करीत असलेली टाळाटाळ, गिरण्यांची आर्थिक परिस्थिती सुस्थितीत आणणे तसेच कामगारांच्या हिताच्या दृष्टीने प्रभावी उपाययोजना राबविण्याची नितांत आवश्यकता व याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(२) **सर्वश्री सुभाष पाटील, संदिप नाईक, आजित पवार, दिलीप वळसे-पाटील, जयंत पाटील, जितेंद्र आव्हाड, किसन कथोरे, राधाकृष्ण विखे पाटील, विजय वडेट्टीवार, अब्दुल सत्तार अब्दुल नबी, नितेश राणे, अतुल भातखळकर, संजय पोतनीस, दत्तात्रय भरणे, अमिन पटेल, कालीदास कोळंबकर, अस्लम शेख, प्रा.वीरेंद्र जगताप, मो.आरिफ नसीम खान, श्रीमती दिपीका चव्हाण, सर्वश्री सुरेश लाड, भास्कर जाधव, हनुमंत डोळस, बाळासाहेब पाटील, हसन मुश्रीफ, शशिकांत शिंदे, पाडुरंग बरोरा, संग्राम थोपटे, सरदार तारासिंह, अजय चौधरी, प्रकाश आबिटकर, सुनिल प्रभु, ॲङ.वारिस पठाण, सर्वश्री अमित देशमुख, सय्यद इम्तियाज जलील, भिमराव तापकीर, प्रताप सरनाईक, सुनिल शिंदे, ॲड भिमराव धोंडे, श्री.अबू आजमी, प्रा.मेधा कुलकर्णी, वि.स.स पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सार्वजनिक उपक्रम मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मुंबई-पुणे यशवंतराव चव्हाण द्रुतगती महामार्गावर पनवेल जवळ दि. ५ जून, २०१६ रोजी खाजगी बस, इनोव्हा व स्विफ्ट कारच्या झालेल्या भीषण अपघातात १७ जणांचा मृत्यू तर ४५ जण जखमी झाल्याचे घडलेली दुर्देवी घटना, गत १५ वर्षात या मार्गावर झालेल्या एकूण १२९९ अपघातात ३२१ जणांचा मृत्यू व १४२५ जण गंभीररित्या जखमी होणे, ९४ कि.मी. लांबीच्या या मार्गावर प्रती ताशी ८० कि.मी. पेक्षा जास्त वेग नसावा असे बंधन असताना त्याचे होणारे उल्लंघन, तसेच मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर सन २०११ व एप्रिल, २०१६ या कालावधित ६२२ जणांचा मृत्यू व २,१४२ जण गंभीर जखमी होणे, रस्त्याचे ठरावीक कालावधीनंतर सुरक्षा ऑडिट करणे गरजेचे असतांना ठेकेदार व कंपनीकडून त्याची अंमलबजावणी न होणे, वेगावर नियंत्रण आणणारी यंत्रणा महामार्ग पोलिसांकडे नसुन दरडी कोसळु नयेत यासाठी करावयाच्या उपाययोजना अद्यापही अपूर्ण असणे, एम.एस.आर.डी.सी. तर्फे तळेगांव येथे बांधण्यात आलेले ट्रामा सेंटर ४ वर्षापासून बंद असल्यामुळे त्या रस्त्यावर ट्रामा सेंटर सुरु करण्याची आवश्यकता त्यासाठी दोन्ही बाजूसाठी ट्रामा ॲम्ब्यूलन्सची तसेच महामार्गावर ज्या वळणावर वारंवार अपघात होतात ते ठिकाण अतिधोकादायक म्हणून घोषित करण्याची आवश्यकता, महामार्गाच्या सुरक्षेसाठी इंजिनिअरींग, एज्यूकेशन, एनफोर्समेंट आणि इमर्जन्सी या ४E वर भर देण्याची आवश्यकता बांधकामात नवेनवे तंत्रज्ञान येत असतानाही या महामार्गावर होणारे अपघात टाळण्यास शासनास आलेले अपयश, त्यामुळे सामान्य नागरिकांत पसरलेले असंतोषाचे वातावरण, उपरोक्त अपघाताची तातडीने चौकशी करुन मृत पावलेल्या व जखमी झालेल्या व्यक्तींच्या वारसांना आर्थिक मदत देण्याची तसेच या महामार्गावर वारंवार होत असलेले अपघात रोखण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची आवश्यकता, यासंदर्भात शासनाने करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया."

(३) **श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, ॲड राहूल कुल, वि.स.स.पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"१४ जून हा जागतिक 'रक्तदाता दिना' निमित्त आयोजित करण्यात येणारी रक्तदान शिबीरे, हजारो बाटल्या संकलित करण्यात येणारे रक्त, तथापि रक्त संक्रमणातून एचआयव्हीची बाधा होण्यात महाराष्ट्राचा असलेला तिसरा क्रमांक, ऑक्टोबर, २०१४ ते मार्च, २०१६ या कालावधीत

राज्यात २७६ जणांना झालेली एचआयव्हीची बाधा, रक्त संक्रमणातून हेपेटायटीस बी व सी, मलेरिया यांची लागण होणे, रक्तदात्याला दिल्या जाणाऱ्या फॉर्मवर रक्तदात्याने भरलेली चुकीची माहिती, परिणामी रक्तसंक्रमणाचा निर्माण झालेला धोका, रक्तदात्याला एचआयव्हीची बाधा होऊन दोन ते तीन महिन्यापर्यंतचा काळात रक्त चाचणी केली तरी त्यातून काही निष्पन्न न होणे, फोर्थ जनरेशन एलायझा टेस्टमुळे तीन आठवड्यात चाचणीत बाधा झाल्याचे निष्पन्न होणे, तथापि न्यूक्लिक ॲसिक टेस्टींग (नॅट) मध्ये एका आठवड्यात एचआयव्हीच्या संसर्गाचे निदान करता येणे, नॅट चाचणीमुळे एचआयव्ही, हेपेटायटीस बी व सी या तीन संसर्गाचे लवकरच होणारे निदान, तथापि, नॅट चाचणीमुळे रक्ताची किंमत सरासरी एक हजार रुपयांनी वाढणे, चाचणीचे किट महाग असल्यामुळे शुद्ध रक्तासाठी नॅटची चाचणी अल्पदरात उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**पाच : शासकीय विधेयके :**

**(अ) पुर:स्थापनार्थ :-**

सन २०१६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३१ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (तिसरी सुधारणा) विधेयक, २०१६.

---

**(ब) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

**(१)** (क) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री पृथ्वीराज चव्हाण, अमीन पटेल, राधाकृष्ण विखे पाटील, राहुल मोटे, हसन मुश्रीफ, विजय वडेट्टीवार, सुरेश लाड, अस्लम शेख, अबू आझमी, हर्षवर्धन सपकाळ, जयंत पाटील, अजित पवार, दिलीप वळसे-पाटील, बाळासाहेब पाटील, डॉ.सतीश पाटील, श्री.वैभव मधुकर पिचड, श्रीमती दिपीका चव्हाण, सर्वश्री भास्कर जाधव, दिपक चव्हाण, संजय कदम, राणाजगजितसिंह पाटील, डॉ.जितेंद्र आव्हाड, हनुमंत डोळस, जयदत्त क्षीरसागर, राहुल जगताप, शशिकांत शिंदे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०१६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ९ – महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०१६ नापसंत करते."

(ख) **सन २०१६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २६ - महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१६.**

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१६ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक २६ - महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. हर्षवर्धन सपकाळ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१६ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक २६ - महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अजित पवार, जयंत पाटील, दिलीप वळसे पाटील, शशिकांत शिंदे, जयदत्त क्षीरसागर, जितेंद्र आव्हाड, भास्कर जाधव, राणाजगजितसिंह पाटील, हसन मुश्रीफ, श्रीमती दिपिका चव्हाण, सर्वश्री बाळासाहेब पाटील, दिपक चव्हाण, पांडुरंग बरोरा, राहुल जगताप, वैभव पिचड, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१६ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक २६ - महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

(२) (क) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री राधाकृष्ण विखे पाटील, राहुल मोटे, हसन मुश्रीफ, विजय वडेट्टीवार, सुरेश लाड, अस्लम शेख, अमीन पटेल, जयंत पाटील, अजित पवार, दिलीप वळसे-पाटील, बाळासाहेब पाटील, डॉ.सतीश पाटील, श्री.वैभव मधुकर पिचड, श्रीमती दिपीका चव्हाण, सर्वश्री भास्कर जाधव, दिपक चव्हाण, संजय कदम, राणाजगजितसिंह पाटील, डॉ.जीतेंद्र आव्हाड, हनुमंत डोळस, जयदत्त क्षीरसागर, राहुल जगताप, शशिकांत शिंदे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०१६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १४ — महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) अध्यादेश, २०१६ नापसंत करते."

(ख) **सन २०१६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३० - महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१६.**

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१६ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ३० - महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. राधाकृष्ण विखे-पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१६ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ३० - महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. सुभाष ऊफ पंडितशेट पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१६ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ३० - महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(च) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. हर्षवर्धन सपकाळ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१६ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ३० - महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---------------------------------------------------------------------------------

(३) (क) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री अमीन पटेल, राधाकृष्ण विखे पाटील, राहुल मोटे, हसन मुश्रीफ, विजय वडेट्टीवार, सुरेश लाड, अस्लम शेख, अबू आझमी, हर्षवर्धन सपकाळ, जयंत पाटील, अजित पवार, दिलीप वळसे-पाटील, बाळासाहेब पाटील, डॉ.सतीश पाटील, श्री.वैभव मधुकर पिचड, श्रीमती दिपीका चव्हाण, सर्वश्री भास्कर जाधव, दिपक चव्हाण, संजय कदम, राणाजगजितसिंह पाटील, डॉ.जीतेंद्र आव्हाड, हनुमंत डोळस, जयदत्त क्षीरसागर, राहुल जगताप, शशिकांत शिंदे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०१६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १३ — महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (सुधारणा) अध्यादेश, २०१६ नापसंत करते."

(ख) **सन २०१६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २५ - महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (सुधारणा) विधेयक, २०१६.**

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१६ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक २५ - महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (सुधारणा) विधेयक, २०१६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. हर्षवर्धन सपकाळ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१६ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक २५ - महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (सुधारणा) विधेयक, २०१६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अजित पवार, दिलीप वळसे पाटील, जयंत पाटील, शशिकांत शिंदे, भास्कर जाधव, हनुमंत डोळस, पांडुरंग बरोरा, जितेंद्र आव्हाड, श्रीमती दिपिका चव्हाण, सर्वश्री. हसन मुश्रीफ, वैभव पिचड, राहुल जगताप, राणाजगजितसिंह पाटील, वि.स.स. वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१६ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक २५ - महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (सुधारणा) विधेयक, २०१६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**सहा : सर्वश्री राधाकृष्ण विखे पाटील, अजित पवार, पृथ्वीराज चव्हाण, दिलीप वळसे-पाटील, जयंत पाटील, विजय वडेट्टीवार, डॉ.पतंगराव कदम, सर्वश्री शशिकांत शिंदे, जयदत्त क्षीरसागर, गोपालदास अग्रवाल, डॉ.जितेंद्र आव्हाड, प्रा.विरेंद्र जगताप, सर्वश्री के.सी.पाडवी, अब्दुल सत्तार, अबू आजमी, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री अमीन पटेल, सुभाष उर्फ पंडितशेट पाटील, अस्लम शेख, भारत भालके, हर्षवर्धन सपकाळ, सुरेश लाड, संग्राम थोपटे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :-**

"गेल्या दोन वर्षांमध्ये0 राज्याच्या मंत्रिमंडळात वाढत असलेल्या भ्रष्टाचाराची उघडकीस आलेली प्रकरणे, त्यातून मंत्र्यांना राजीनामा द्यावा लागणे, उर्वरित भ्रष्टाचाराची प्रकरणे उघडकीस येऊनही संबंधित मंत्र्यांवर अद्याप कोणतीच कारवाई न होणे, अनेक मंत्र्यांवर सुरु असलेली न्यायालयीन प्रकरणे, भरीस भर पुन्हा विस्तारात समाविष्ट केलेल्या मंत्र्यांकडे गृहनिर्माण (राज्य), रोजगार हमी योजना, कौशल्य विकास, कामगार बंदरे (राज्य) अशी विविध महत्वाची खाती सुपूर्द करणे, महिला व बालविकास विभागामार्फत पुरविण्यात येत असलेल्या शालेय पोषण आहार निविदा प्रक्रियेत झालेल्या गैरप्रकारावरुन न्यायालयाने फटकारणे व सदर निविदा रद्द करावी लागणे, परिवहन विभागातील ट्रायमॅक्स घोटाळा, नवीन मंत्र्यांपैकी अनेक मंत्र्यांवर कागदपत्रांमध्ये खाडाखोड करुन बँकांची फसवणूक करणे, असुरक्षित कर्जाचे वाटप करुन बँक बुडविणे, अशा अनेक प्रकरणांबाबत संबंधित मंत्र्यांवर एसआयटी, सीबीआय व सीआयडीमार्फत चौकशी सुरु असणे, अशा भ्रष्ट आणि गंभीर आरोप असलेल्या मंत्र्यांचा समावेश मंत्रिमंडळात केल्यामुळे तसेच अगोदरच्या मंत्र्यांना क्लीन चीट दिल्यामुळे जनतेच्या मनात या शासनाबद्दल अविश्वास निर्माण होणे, राज्याचे मंत्रीच भ्रष्टाचारी असल्याने प्रशासनावरही पकड न राहणे, परिणामी अधिकाऱ्यांसह संपूर्ण व्यवस्थाच भ्रष्टाचाराने पोखरली जाण्याची निर्माण झालेली शक्यता, अशा सर्व प्रकरणांची सविस्तर चौकशी होऊन कठोर कारवाई करण्याची आवश्यकता व शासनाची भूमिका."

**सात : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-**

**(मंगळवार, दिनांक १९ जुलै, २०१६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात आलेल्या तथापि, प्रलंबित असलेल्या अर्धा तास चर्चेच्या सूचना — क्रमांक १ व २)**

(१) **श्री. हर्षवर्धन सपकाळ, वि.स.स.**

"**बुलढाणा जिल्ह्यातील मागासवर्गीय विद्यार्थी गणवेश व लेखन साहित्य योजनेपासून वंचित असल्याबाबत**" या विषयावर श्री. हर्षवर्धन सपकाळ, वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ४७७९९ ला दिनांक १८ मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

(२) **श्रीमती ज्योती कलानी, वि.स.स.**

"**उल्हासनगर पाणी वितरण व्यवस्थेची चौकशी करण्याबाबत**" या विषयावर श्रीमती ज्योती कलानी, वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ५०१६७ ला दिनांक १२ एप्रिल, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

(३) **श्री. किशोर पाटील, वि.स.स.** पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.

" राज्यातील काही जिल्हा परिषद शाळांमध्ये शिक्षकांअभावी विद्यार्थी संख्या कमी होणे, समायोजन समुपदेशन पद्धतीमुळे अतिदुर्गम भागातील शिक्षकांच्या जागा नेहमी रिक्त असणे, समुपदेशन पद्धतीमुळे शिक्षक प्रथम शहरी भागातील किंवा शहरी भागालगतच्या शाळांना प्राधान्य देत असल्यामुळे अतिदुर्गम भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होत असलेला परिणाम, याकरिता शासनाने प्रथम नियुक्ती मिळणाऱ्या शिक्षकाचे समुदेशन बंद केल्यास अतिदुर्गम भागातील शाळांना शिक्षक मिळण्याची शक्यता असल्याने याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(४) **श्री. डी. मल्लिकार्जुन रेड्डी, वि.स.स पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

" नागपूर जिल्ह्यातील बावनथडी प्रकल्पबाधीत मौजा पुसदा, चिखणापूर, पिंडकापार या गावातील नागरिकांची पुनर्वसन प्रक्रिया सन २०१२ पासून सुरु असून अद्यापही तेथील नागरिकांचे पुनर्वसन न होणे, प्रकल्पबाधीत नागरिकांना जमीन, शासकीय सेवेत नोकरी तसेच १८ सुविधा देण्यात न येणे, परिणामी प्रकल्पबाधीत नागरिकांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २० जुलै, २०१६

**डॉ. अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.